महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 02/09/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 5 कि. मी अंतरावर शिवनगर मौदा येथे दिनांक 31/08/2021 चे 23.59 वा. ते दिनांक 01/09/2021 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धम्मदीप श्यामराव गणवीर, वय 35 वर्ष, रा. खेडेपार ता. लाखनी जि. भंडारा ह. मु. शिवनगर मौदा हे बाहेर गावी गेले असतांना त्यांचे घराच्या दरवाज्याचा कुलुप अज्ञाम आरोपीने तोडून घरात प्रवेश केला. यानंतर अरोपीने गोदरेज च्या आलमारितील 18 ग्राम सोन्या– चांदीचे दागिने कि. 37,000/–रू. चा माल तसेच मोहल्यातील दिनेश कलसरपे यांचे घरातील आलमारीमधील 11 ग्राम सोन्याचे दागिने किमती 22,000/–रू. तसेच ज्ञानिवंत वैद्य यांच्या घरातील आलमारीतील 120 ग्राम चांदी चे दागिने किमती 13,000/–रू. व मोहलल्यातील नर्मदेश्वर शिव मंदिर व हनुमान मंदिराचे दान पेटीचे कुलुप तोडून 2,000/–रू असा एकुण कि. 74,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री सोनेकर 8975921770 हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर गडमंदीर रामटेकच्या मागे येथे दिनांक 01/09/2021 चे 16.30 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– आश्विन हेमराज राउत वय 24 वर्षे जात गोवारी रा. जाम कांद्री जि भंडारा हा त्याच्या घराजवळील राहणारे रमेश फत्तु बोरकर यांची एमएच– 36/यु– 9089 कमांकाची पॅशन एक्स प्रो मोटरसायकल घेउन फिरण्यास गडमंदीर येथे आला असता गडमंदीराच्या मागे ठेवुन फिरायला गेला. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची गाडी कीं 35,000/–रू. ची मोटारसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोहर राउत मो नं 9423628307 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 16 कि मी अंतरावर भुगाव येथे दिनांक 20/02/2018 चे 00.00 ते दिनांक 24/02/2021 चे 00.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन सुरेश आंबीलडुके वय 29 वर्ष रा. भुगाव ता. कामठी जि. नागपुर व त्याचा मित्र वसंता दयाराम वंजारी रा. भुगाव ता. कामठी जि. नागपूर यांना आरोपी नामे– 1) जितेंद्र मधुकर गावंडे, रा. प्लॉट नं. 15 सुदर्शन नगर, हुडकेश्वर नागपूर, 2) अतुल किशनराव लाखंडे रा. शिवमंदीर जवळ सर्वे नं. 19 गांगधळे नगर सासवड रोड हडपसर पूणे सिटी. ह.मु. दिलीप वने क्वाटर नागपूर, 3) अविनाश सुरेश काळे रा. साईनगर दिघोरी जि. नागपूर 4) निलेश अरूण डोंगरे, रा. हातरूल जि. अकोला ह.मु. मिलींदनगर तल्हारा जि. अकोला 5) मानिक चिंतामण गवारगुरू रा. खकटा पो. पंचगव्हाण ता. तेल्हारा. जि. अकोला ह.मु. मिलींदनगर तल्हारा जि. अकोला 6) योगेश दामूअण्णा टोंग रा. प्लॉट नं. 41 हनूमान मंदिर जवळ शहाने ले आवूट नागपूर यांनी कट करून खोटे ट्रेनिंग कॉल लेटर देवून फिर्यादी यांचे कडून रेल्वे मध्ये टि.सी. ची नोकरी लावून देतो

म्हणून 10,00,000/–रु. व त्याचा मित्र वसंता वंजारी याला कमर्शीयल क्लर्कची नोकरी लावून देतो असे आमिश दाखवून त्याचे कडून टप्प्या टप्याने एकुण 21,00,000/–रु दिले. व नोकरी न लावता पैसे परत केले नाही व अर्जदार व त्याचे मित्राची फसवुणक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 420, 465, 468, 471, 120 (ब) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रमोद चौधरी मो.न.9823217205 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बेला :– अंतर्गत सोनेगाव कवठा रोड येथे दिनांक 01/09/2021 चे 02:00 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे– मारोती भिवाजी ठाकुर वय 70 वर्ष रा. पाजंरा लोधी तह. जि. नागपुर हे आपल्या एम.एच– 40/ बीआर–7769 क्रमांकाच्या मोटरसायकलने सोनेगाव ते कवठा डाबंरी रोडने जात होते. त्यादरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने टर्नींगवर समोरुन धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडीलांना डोक्याला मार लागुन ते गंभीर जखमी झाल्याने जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद मारोती ठाकुर वय 41 वर्ष रा. पाजंरा लोधी तह. जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीचालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. ठेंगणे 9823364147 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर